स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
दूरध्वनी क्रमांक
०२०२५६२२६८०
०२०२५६२२६८८
०२०२५६२२६८९
०२०२५६२२६९०
०२०२५६२२६९१

फॅक्स क्रमांक २५६०११५४

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे ४११००७

**रासेयो/२०२२-२३/** **अत्यंत महत्वाचे व तातडीचे** **दि. १८/१/२०२३**

**प्रति,**

**मा. प्राचार्य/संचालक**

**रासेयो व विविमं संलग्नित महाविद्यालये व परिसंस्था**

**फक्त पुणे व पिंपरी-चिंचवड शहर**

**विद्यापीठ परिसरातील सर्व शैक्षणिक विभाग, पुणे**

विषय : आर्ट ऑफ लिव्हिंग प्रणित "**EduYouth Meet**" उपक्रमाच्या नियोजन बैठकीकरिता उपस्थित राहणेबाबत

महोदय/महोदया,

आर्ट ऑफ लिव्हिंगने कोविड काळात युवक, विद्यार्थी तसेच कोविड बाधित रूग्ण, नागरिक व त्यांचे कुटुंबिय यासर्वांसाठी एकत्रितरित्या मनोस्वास्थ्य वर्धन करणारे, आत्मविश्वास पुनर्जागृत करणारे अनेकविध उपक्रम राबवून जनजीवन सुरळीत करण्याच्या दृष्टीने भरीव सहभाग घेतलेला आहे. आर्ट ऑफ लिव्हिंगच्या या कार्याला केंद्र व राज्य शासन, विविध प्राधिकरणे व संस्था तसेच अनेक विद्यापीठांनी देखिल सकारात्मक मान्यता दिलेली आहे. अशा समाजाभिमुख उपक्रमांचे आयोजन निरंतर व्हावे व शैक्षणिक संस्था, विद्यापीठे व संबंधीत यंत्रणानी त्यात सहभागी व्हावे या दृष्टीने यु.जी.सी.ने देखिल निर्देशित यापुर्वी केलेले आहे.

यानुसार आर्ट ऑफ लिव्हिंग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व आपल्या प्रथितयश संस्थेच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दिनांक ०४ फेब्रुवारी, २०२३ रोजी सायं ०६.०० ते ०९.०० या कालावधीत पुणे येथे सुर्यकांत काकडे फार्मस्, कोथरूड, पुणे या ठिकाणी १,००,००० (एक लाख) विद्यार्थ्यांचा भव्य युवा मेळावा आयोजित केलेला आहे. सांस्कृतिक कार्यक्रम, तज्ञांचे मार्गदर्शन, उपस्थितांद्वारा अमंली पदार्थ विरोधी संकल्प व प्रतिज्ञा आणि श्री श्री रविशंकर यांच्याशी संवाद असे या भरगच्च कार्यक्रमाचे स्वरूप आहे.

सदर उपक्रमाच्या आयोजनाकरिता **पुणे व पिंपरी-चिंचवड शहरातील कार्यक्रम अधिकारी व विद्यार्थी कल्याण अधिकारी यांची नियोजन सभा, दिनांक १९/०१/२०२३ रोजी, दुपारी १.०० वाजता संत नामदेव सभागृह, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ** येथे आयोजित करण्यात आलेली आहे.

तरी आपल्या महाविद्यालयातील कार्यक्रम अधिकारी व विद्यार्थी कल्याण अधिकारी यांना उपरोक्त ठिकाणी व दिलेल्या वेळेत अनिवार्यपणे उपस्थित राहण्याबाबत सूचित करावे, तसेच सदर कालावधीत सदर प्राध्यापकांची कर्तव्य रजा मंजूर करण्यात यावी.

**संचालक**
**विद्यार्थी विकास मंडळ**

**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**